"राज्यातील संवेदनशील वनक्षेत्रात वनसंरक्षणाकरीता राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकडया कायमस्वरुपी वन विभागाकडे ठेवणे" या योजनेतर योजनेखालील अस्थायी पदे सन २०१७-२०१८ मध्ये पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक:- टिआरएस-०१/२०१७/प्र.क्र.५/फ-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७ जानेवारी, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.टिआरएस-१/२०१७/प्र.क्र.५/फ-६, दिनांक १८.१०.२०१७
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६ आपुक दिनांक ८.१.२०१८
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-३/यो/प्र.क्र.१/१६-१७/१९१२/१७-१८ दि.१०.१.२०१८

शासन निर्णय :-

"राज्यातील संवेदनशील वनक्षेत्रात वनसंरक्षणाकरीता राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकडया कायमस्वरुपी वन विभागाकडे ठेवणे" या योजनेतर योजनेमधील ३८ अस्थायी पदास दिनांक १.१०.२०१७ ते दिनांक ३१.१२.२०१७ पर्यत संदर्भिय क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली होती.

२. या योजनेतर योजनेखालील ३८ अस्थायी पदांना दिनांक १.१.२०१८ ते दिनांक २८.२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी शासनास सादर केला आहे.

३. वित्त विभागाने त्यांचा संदर्भाधिन क्रमांक २ चे शासन निर्णयानुसार दिनांक ८.१.२०१८ सर्व शासकीय विभाग व कार्यालयांच्या सुधारीत आकृतीबंधातील सर्व अस्थायी पदांना दिनांक १.१.२०१८ ते दिनांक २८.२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना देण्यात आलेले आहेत.

४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भाधिन क्र.३ चे पत्रान्वये प्रशासकीय विभागांना दिनांक १.१.२०१८ ते दिनांक २८.२.२०१८ पर्यत अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्यात यावी अशी विनंती शासनास केली आहे.

५. उक्त परिस्थितीत "वनसंरक्षण सर्वसाधारण संरक्षण" या योजनेतर योजनेखालील ३८ अस्थायी पदास दिनांक १.१.२०१८ ते दिनांक २८.२.२०१८ पर्यत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

६. सदरहू पदावर होणारा खर्च हा खाली नमुद केलेल्या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व त्याखालील सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

प्रधान शीर्ष	-	२४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेत्तर)
उपप्रधान शीर्ष	-	०१ वनीकरण
गौण शीर्ष	-	१०१ वनसंधारण विकास व पुनर्निर्मिती
उप गौण शीर्ष	-	(०३) आग लागण्यापासून वनांचे सरंक्षण (०३)(०१) आग लागण्यापासून वनांचे सरंक्षण (२४०६ ०१३१)

७. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६ आपुक दिनांक ८.१.२०१८ मधील तरतुदीनुसार विभागास असलेल्या प्राधिकारात सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०११८१६४७१९३२१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.01.18 16:51:00 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने),
महसूल व वन विभाग

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर, ठाणे, धुळे,
५) महालेखापाल-१/२(लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६) महालेखापाल-१/२, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
८) वित्त विभाग, व्यय-१०/ अर्थ-६, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
९) वित्त विभाग, वित्तिय सुधारणा-१, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०) ब-१/फ-२/फ-४ कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) फ-६ कार्यासन, महसूल व वन विभाग (निवडनस्ती), मंत्रालय, मुंबई-३२.